महाराष्ट्र शासन

**महसुल व वनविभाग**

**उपवनसंरक्षक, सोलापूर वनविभाग, सोलापूर यांचे कार्यालय**

"वनभवन" विजापूर रोड,सोलापूर, 413 004.

दूरध्वनी क्र. 0217/2345096 ई-मेल forestofficesolapur@gmail.com फॅक्स नं.0217/2345096.

जा.क्र.ब/कक्ष-13/मोजणी/395 /2023-24 सोलापूर ,413 004 दिनांक, /05/2023.

विषय:- Proposal for diversion of forest land for proposed Greenfield Railway line between Solapur- Tuljapur- Osmanabad (Total Length of 84.439 Km) passing through Solapur and Osmanabad districts in the State of Maharashtra. (FP/MH/RAIL/155198/2022)

प्रति,

1. उपमुख्य अभियंता (C)-II,
   मध्ये रेल्वे, भुसावळ, जि. जळगाव.
2. उपमुख्य अभियंता (Const),
   मध्ये रेल्वे, सोलापूर

संदर्भ- 1. आपलेकडिल ऑनलाईन प्रणालीवरील प्रस्ताव क्र. (FP/MH/RAIL/155198/2022).
2. आपलेकडील पत्र क्र. SUR-UMD/New BG Line/Forest Pro./01, दि. 15/05/2023.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मौ. सोलापूर ता. उत्तर सोलापूर येथील राखीव वन ग. नं. 496 तसेच मौ. मार्डी ता. उत्तर सोलापूर येथील राखीव वन ग. नं. 165, 216 व 217 मधून सोलापूर-तुळजापूर- धाराशिव या रेल्वे मार्ग टाकणेसाठी आवश्यक 3.3685 हे. वनक्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गतचा प्रस्ताव वरील संदर्भान्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी असल्याचे दिसून येत आहे.

1. आपण सादर केलेल्या प्रस्तवामधील क्षेत्र विवरण तक्ता (Area Statement) हे विहीत नमुन्यामध्ये नाही.
2. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील पार्ट-1 मधील Employment likely to be generated मध्ये Skilled, Semi Skilled व Unskilled Employment दर्शविणे आवश्यक आहे.
3. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील Project Note ही विहीत नमुन्यामध्ये नाही.
4. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील Typical Cross Section वर सही केलेली नाही.
5. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Administrative व Technical मान्यतेची प्रत जोडलेली नाही.
6. आपण सादर केलेल्या प्रस्तावामध्ये प्रस्तावीत वनक्षेत्राचे 7/12 उतारे मराठी व इंग्रजीमध्ये अनुवादीत करून जोडलेले नाहीत.
7. आपण सादर केलेल्या प्रस्तावामधील टोपोशिट व इतर नकाशे हे अस्पष्ट दिसत आहेत. त्यामुळे सदरचे नकाशे हे सुस्पष्ट प्रिंट काढून प्रकरणी समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करून सुधारित प्रस्ताव 7 प्रतीत फेरसादर करावा जेणे करून सदरचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल. सोबत वरील संदर्भ क्र. 2 अन्वये या कार्यालयास सादर केलेले प्रस्तावाच्या पाच प्रती यासोबत परत पाठविण्यांत येत आहेत.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

उपवनसंरक्षक
सोलापूर वनविभाग, सोलापूर

प्रतिलीपी- 1. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे वरीलप्रमाणे माहितीसाठी सविनय सादर.
2. मा.मुख्यवनसंरक्षक(प्रा),पुणे यांना वरीलप्रमाणे माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- 1. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो),सोलापुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
2. वनपरिक्षेत्र अधिकारी, सोलापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांना कळविण्यांत येते की, वरील बाधीत होणा-या वनक्षेत्रातील वृक्षांची मोजदाद, प्रजातीनिहाय, वेढीनिहाय माहिती तसेच वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व विहीत नमुन्यातील स्थळपाहणी अहवाल तसेच प्रस्तावीत ग. नं. चा वैधानिक दर्जा व त्यामध्ये कोणती न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे अथवा कसे याबाबतची माहिती सादर करण्यांत यावी.

Scanned by CamScanner